Impact Factor – 7.149

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

April - 2021

## Theme of the Special Issue

## Dr.Babasaheb Ambedkar : An Architect of India

**Chief Editor**

Pramod P. Tandale

**Editor**

Prof. Meghavee G. Meshram

Prof. Naresh W. Patil

**IMPACT FACTOR**

SJIF 7.149

For details Visit our website

www.aiirjournal.com

| Sr. No. | Name of the Author | Title of the Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 223 | प्रा.संतोष विश्वनाथ यादव | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीव्यवस्थे संबंधी चिकित्सक विचार | 1049 |
| 224 | प्रा. अर्जून वामणराव कांबळे | डॉ. बाबासाहेब आणि आजचा बौध्द समाज.एक दृष्टिकोण | 1053 |
| 225 | डॉ. अनिल म्हाळाप्पा गाडेकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समाजसुधारणा : एक समाजशास्त्रीय अभ्यास | 1057 |
| 226 | विकास गवई | पत्रकारिता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 1062 |
| 227 | डॉ. विनोद संभाजी सोनवणे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार : एक चिकित्सक अभ्यास | 1066 |
| 228 | डॉ. मृदुला निळकंठ रायपुरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाषावार प्रांतरचना | 1070 |
| 229 | डॉ. सीमा लालचंद गोलाईत | स्त्रीयांचे मानवाधिकार: डाॅ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून | 1073 |
| 230 | डॉ. अनिता ए. सार्वे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांसाठी कार्य | 1078 |
| 231 | डॉ. रागिणी मोटघरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय महिलांचे सक्षमीकरण | 1082 |
| 232 | डॉ. एम.के. कन्नाडे | कामगारांचे कैवारी : डॉ बाबासाहेब आंबेडकर | 1085 |
| 233 | डॉ. लक्ष्मीकांत चोपकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कामगार चळवळ - एक दृष्टिकोन | 1092 |
| 234 | प्रा डॉ. के पी देशमुख | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक कार्य आणि भारतीय अर्थव्यवस्था | 1099 |
| 235 | प्रा.शशिकांत दिवाण भामरे | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे अध्ययन | 1104 |

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149
14th April 2021

# कामगारांचे कैवारी : डॉ बाबासाहेब आंबेडकर

डॉ. एम.के. कन्नाडे
सहाय्यक प्राध्यापिका
(समाजशास्त्र विभागप्रमुख)
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर
Email- swamimamata@gmail.com

**गोषवारा:**

आज प्रत्येकजण हा एक प्रकारचा कामगारच आहे. काही लोक स्वतःचा व्यवसाय सुरु करून काम करतात तर काही इतराच्या व्यवसाय, कारखाना किंवा शेतीवर काम करतात. देशातील प्रत्येक नागरिक स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी काहीना काही काम करीत असतो. एक कामगार म्हणून आज आपल्याला भरपूर सोयी सवलती मिळत असतात. हे मिळण्यामध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान विसरून चालणार नाही. ज्याने कामगारांचे प्रश्न, त्यांची परिस्थिती, समस्या, व्यथा जवळून बघितल्या होत्या. आणि हे प्रश्न किंवा समस्या सोडवण्यासाठी आणि कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी नेहमी लढा दिला व कामगारांना न्याय मिळवून दिला. आणि ती व्यक्ती आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची कामगारांविषयी भूमिका, त्यांचे कामगारांसाठी योगदान फार महत्वपूर्ण होते. डॉ आंबेडकर हे शेतकरी कामगार आणि भूमीहीनांचे एक प्रभावी पुढारी म्हणून कार्य केले.

बाबासाहेब आंबेडकरांवर देशाची राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी आली होती. तेव्हा कामगाराच्या अनेक प्रश्नांचा खोलवर अभ्यास करून कामगारांसाठी समान संधीचा आणि समानतेचा विचार संविधानात मांडला

समग्र भारतातील कामगार आणि कामगार चळवळ, कामगार कायदे, स्त्री कामगारा बद्दलची आत्मीयता, त्यांच्या कौटुंबिक संसाराविषयी चिंता, त्यांच्या जीवनातील उन्नतीचा मार्ग केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरामुळेच सुकर झाला असे म्हणता येईल. भारताच्या राजकीय क्षितीजावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसते तर दलित, शोषित, कामगारांची आणि पीडितांचे भवितव्य अंधकारमय झाले असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार कल्याणाचा मार्ग खऱ्या अर्थाने मोकळा केला असे म्हणता येईल कारण कामगारांच्या अन्याय अत्याचाराविरुद्ध लढा देऊन अन्यायाला वाचा फोडली आणि आजच्या कामगाराला खरा न्याय मिळवून देऊन त्यांना सशक्त बनवले. डॉ. आंबेडकर सर्व देशाचे नेते होते. त्यांच्या विचारानुसार अनुकरण करणे महत्वाचे आहे.

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मध्य प्रांतातील महू येथील लष्करी छावणीत सुभेदार रामजी मालोजी सकपाळ (अंबावडेकर) व भिमाबाई यांच्या पोटी जन्मलेले त्यांचे चौदावे अपत्य होते. अस्पृश्य समाजातील मॅट्रिक उतीर्ण झालेले ते पहिले विद्यार्थी होते नंतर मात्र ते भारतरत्न झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर समाजसुधारक, विचारवंत, अर्थतज्ञ, शिक्षणतज्ञ, कायदेपंडित, घटनाकार, नामवंत संसदपटू, संपादक, लेखक,